महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/लोकअदालतींचीजनजागृती/२०२२/ 1390 दिनांक : 24 MAR 2022

**तातडीचे**

प्रति,
संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये

**विषय :- राज्यात दि११ १२ २०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत...**

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र. १६/ आस्था/संकीर्ण/२०२१/१०४, दिनांक १६-०३-२०२२

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भीय संचालनालयाच्या पत्राचे व शासन अधिसूचनेचे अवलोकन करण्यात येवून राज्यात दि. ११.१२.२०२१ नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ ईमेल वर इत्यादी बाबतची माहिती दिनांक <u>२३ मार्च २०२२ पर्यंत</u> या कार्यालयास सादर करावी. **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी.

(डॉ द.व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**सोबत : संदर्भीय पत्र,**

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ
पत्र क्रमांक . १६/आस्था/संकीर्ण/२०२१/ ७०४,
ईमेलव्दारे

दिनांक : 16 MAR 2022

प्रति,
१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत..
संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.२२४/२०२१/ तांशि ३, दि.०९.१२.२०२१ व या संचालनालयाचे पत्र दि.२१.१२.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्रे पहावीत.

प्रस्तुत पत्रान्वये, राज्यात दि.११.१२.२०२१ नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतींची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत शासनामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी, अद्यापी आपली माहिती अप्राप्त आहे.

करीता प्रस्तुत माहिती दि.२१.०३.२०२२ पर्यंत या संचालनालयास सादर करावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
17 MAR 2022
२६८२

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
कार्यासन अधिकारी, संचालनालयातील सर्व कार्यासने

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३५६ — दिनांक : 21 DEC 2021

ईमेलव्दारे

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत..

संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.२२४/२०२१/ तांशि ३, दि.०९.१२.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

प्रस्तुत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यात दि.११.१२.२०२१ नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतींची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत शासनामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करावा.

( वर्षा संदीप गुजरे )
सहाय्यक संचालक(तां.),
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
कार्यासन अधिकारी, संचालनालयातील सर्व कार्यासने

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
दूरध्वनी क्र.२२०४०९३५ मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४१,
Email ID : manali.samant@nic.in मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२२४/२०२१/तांशि-३ दिनांक:-०९ डिसेंबर, २०२१

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई-४०० ००१.

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. ९११ ३८२३
दिनांक २३/१२/२१
कार्यासन क्र. ..९-६

विषय:- राज्यात दि.११ डिसेंबर, २०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीची व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत...

उपरोक्त विषयाबाबत विधि व न्याय विभाग यांनी मा.प्रधान सचिव (उ. व तं.शि.) यांना उद्देशून लिहिलेल्या दि.०३ डिसेंबर, २०२१ च्या पत्राच प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. तरी सदर पत्रात नमूद केल्यानुसार, आपल्या कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या शासकीय जाहीरातींमध्ये "महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई मार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दि.११ डिसेंबर, २०२१ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे नियोजन केले आहे"अश्या तळटीपेचा उल्लेख करावा. तसेच सदर पत्रात दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करावी, ही विनंती.

D-16

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

मुख्य इमारत, ५ मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी: ०२२-२२७९३२३०.

क्रमांक : संकीर्ण-२०२१/३२०/प्र.क्र.२३९/का.२२ | दिनांक : ०३ डिसेंबर, २०२१

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.

विषय:- राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीशी व वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींची जनजागृती करण्याबाबत.

मा. महोदय/महोदया,

विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतूदीअंतर्गत मा. राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशाप्रमाणे, महाराष्ट्र राज्य सेवा विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात तालुका, जिल्हा व मा. उच्च न्यायालयात दि.११.१२.२०२१ या दिवशी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. उदय ललित, कार्यकारी अध्यक्ष, राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दि.०६.०८.२०२१ रोजी सर्व राज्य विधि सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष यांचेसमवेत घेतलेल्या बैठकीमध्ये अधोरेखित केले की, मागच्या राष्ट्रीय लोकअदालतीच्या वेळी काही राज्यांमध्ये शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या शासकीय जाहीरातींमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीबाबत तळटीप देण्यात आली होती.

त्यामुळे राष्ट्रीय लोकअदालतीबाबत लोकांमध्ये जनजागृती झाली. त्याच अनुषंगाने मा. न्यायमूर्ती श्री. ए. ए. सय्यद, कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी आदेशित केले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्र राज्यासाठी ज्या जाहिराती दैनिक वृत्तपत्रामध्ये दिल्या जातात, त्या जाहिरातीमध्ये **"महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई मार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे नियोजन केले आहे"** अशी टीप प्रत्येक जाहीरातीमध्ये देण्यात यावी. अशा प्रकारे टीप दिल्यास राष्ट्रीय लोकअदालतीबाबत लोकांमध्ये जनजागृती होईल. तसेच त्याचा फायदा हा न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणाची संख्या कमी करण्यामध्ये होईल.

३. तरी, राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी नियोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीची जनजागृती करण्यासाठी आपल्या विभागामार्फत तसेच आपल्या अधीनस्थ असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या शासकीय जाहीरातींमध्ये **"महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई मार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दि.११.१२.२०२१ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे नियोजन केले आहे"** अशी तळटीप देण्याबाबत सर्व विभागांना सूचित करण्यात येत आहे.

४. तसेच, विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतूदीअंतर्गत मा. राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशाप्रमाणे,महाराष्ट्र राज्य सेवा विधि सेवा प्राधिकरण, मुंबई संपूर्ण महाराष्ट्र राज्यात तालुका, जिल्हा व मा. उच्च न्यायालयात भविष्यात वेळोवेळी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करील. त्या-त्यावेळी सदर लोकअदालतीची तारीख सर्व विभागांना वेळोवेळी कळविण्यात येईल. त्याप्रमाणे सर्व विभागांनी उपरोक्त निदेशांनुसार आपल्या विभागांच्या जाहिरातीत तळटीप देण्याची कार्यवाही करावी.

आपला,

(देबाशिष चक्रबर्ती)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.
२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.